# परिपत्रक

जयकर ग्रंथालय,
पुणे विद्यापीठ.
दिनांकः-10 नोव्हेंबर2008

विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, ज्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांकडे ग्रंथालयाची पुस्तके ब-याच कालावधीपासून प्रलंबित आहेत व अद्याप त्यांनी ग्रंथालयाकडे ही पुस्तके जमा केली नाहीत अशा सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना विनंती करण्यात येते कि त्यांच्याकडील ग्रंथालयाची सर्व पुस्तके व नियतकालिके ग्रंथालयात त्वरित जमा करावीत.

मा. व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार दि.31 मे,2009 नंतर प्रलंबित कालावधीसाठी प्रत्येक पुस्तकास व प्रत्येक दिवसास विलंब शुल्क भरावे लागणार आहे.

याबाबत मा. व्यवस्थापन परिषदेचा ठराव याप्रमाणे आहे.

प्रस्ताव क्र. मः356/231008
"शिक्षक व शिक्षकेतर सेवकांकडून प्रत्येक वर्षी दि.31 मे पर्यंत वाचनसाहित्य जमा करून घेण्यात यावे. या मुदतीत त्यांनी वाचनसाहित्य जमा न केल्यास त्यापुढील प्रत्येक दिवसासाठी, प्रत्येक पुस्तकासाठी रू. 1/- याप्रमाणे विलंबशुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे."

वरील ठरावानुसार सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना विनंती की, वरील ठरावाचा आशय लक्षात घेवून ग्रंथालयाची पुस्तके व नियतकालिके मुदतीपूर्वी परत करून ग्रंथालयास सहकार्य करावे.

धन्यवाद.

ग्रंथपाल